# शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकांचे सामाईक प्रवेश परीक्षेतील गुण व त्यांची अध्यापन व्यवसाय अभिवृत्ती यांचा सहसंबंधाचा अभ्यास

**डॉ. दिपक प्रभाकर बाविस्कर**
**सहायक प्राध्यापक**
**आर सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय शिरपूर, जि. धुळे.**
dipakbaviskar2020@gmail.com

**सारांश**

संशोधन लेखात शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे सामाईक प्रवेश परीक्षा व व्यवसाय विषयक अभिवृत्ती संदर्भात अभ्यास करण्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात आला होता. सहेतुक नमुना निवड पद्धतीने 40 विद्यार्थिनी आणि 40 विद्यार्थी असे एकूण 80 विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती. माहितीचे संकलन करण्यासाठी विद्यार्थ्यांना सामाईक परीक्षेत मिळालेले गुण तसेच डॉ. उम्मी कुलसुम यांची अध्यापन व्यवसाय विषयक अभिवृत्ती या कसोटीचा वापर करण्यात आला होता. संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी मध्यमान, प्रमाण विचलन 't' मूल्य व 'r' मूल्य या संख्याशास्त्रीय परिमाणांचा अवलंब करून पुढील निष्कर्ष प्राप्त झाले- सामाईक प्रवेश परीक्षेत विद्यार्थ्यांना सारखेच गुण आहेत. विद्यार्थ्यांपेक्षा विद्यार्थिनींमध्ये अध्यापन व्यवसाय विषयक अभिवृत्ती अधिक आहे. विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांच्या सामाईक प्रवेश परीक्षा व अध्यापन व्यवसाय अभिवृत्ती यात धनात्मक व उच्चप्रतीचा सहसंबंध दिसून येतो.

**प्रस्तावना-**

२१ व्या शतकामध्ये झालेल्या ज्ञानाचा विस्फोट यामुळे जग अनेक दृष्टीने समृद्ध व समर्थ बनले आहे. आजच्या काळात शिक्षण हे एक मूलभूत गरज बनली आहे तर आजचे जीवन हे परिवर्तन आहे. त्यामुळे जीवनात सतत परिवर्तन होत असून त्याचप्रमाणे शिक्षण क्षेत्रातही विविध बदल घडत आहेत. एक सद्‌गुण म्हणून मानवी जीवनाला कलाटणी देण्यासाठी शिक्षणाची नितांत आवश्यकता आहे. प्राचीन काळापासून शिक्षण व शिक्षकीपेशा हा पवित्र कार्य मानला जातो. आजही समाजामध्ये शिक्षकाला मानाचे स्थान दिले आहे. त्याच्याच परिणाम म्हणून या व्यवसायाचे आकर्षण म्हणून याकडे येणाऱ्यांची संख्या वाढत आहे. या वाढीमुळे शिक्षकी व्यवसायाचा दर्जा खाली यायला सुरुवात झालेली आहे. या व्यवसायात प्रतिष्ठा मिळू लागली व पैसा मिळू लागला म्हणून याकडे पैसा कमविणे व उपजीविकेचे साधन म्हणून पाहणाऱ्यांचे संख्या प्रचंड प्रमाणात

वाढलेली आहे. आजच्या या युगात मुलांचे भविष्य चांगले निर्माण व्हावे. शिक्षणाचा दर्जा राखला जावा. या व्यवसायात योग्य व हाडाचा शिक्षक यावा, या क्षेत्रात अभिरुची असलेल्या व्यक्तीने प्रवेश करावा. ज्याला या क्षेत्राचे ज्ञान आहे त्याने या क्षेत्राकडे वळावे. NCTE व महाराष्ट्र शासनाने माध्यमिक शिक्षक होण्यासाठी शिक्षणशास्त्र ही पदवी किंवा हा अभ्यासक्रम सुरू केला आहे तो पूर्ण केल्यानंतरच कोणालाही शिक्षक म्हणून हा व्यवसाय करता येऊ शकतो. त्याचबरोबर आता महाराष्ट्र शासनाने 2004-2005 या शैक्षणिक वर्षापासून ज्या व्यक्तीस शिक्षक म्हणून भविष्यात हा व्यवसाय करायचा आहे त्याला बी.एड. पदवी या अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी सामाईक प्रवेश परीक्षा अनिवार्य करण्यात आली व तशी सुरुवात देखील झाली. परीक्षेमुळे किंवा या परीक्षेचा उद्देश शिक्षण क्षेत्रात गुणवत्ताधारक व सर्वांगीण ज्ञान असलेला विद्यार्थी यावा म्हणून प्रवेश घेण्या अगोदर त्याच्या अभियोग्यतेची सामान्य ज्ञानाची आणि तर्कज्ञानाचे मूल्यमापन व्हावे. हे मूल्यमापन सामाईक प्रवेश परीक्षा या माध्यमातून होवून मगच त्याला पुढच्या शिक्षणासाठी प्रवेश देण्यात यावा. या सामाईक प्रवेश परीक्षेत 03 उपविभाग आहेत त्यात शिक्षक अभिवृत्ती, शिक्षक अभिक्षमता व बौद्धिक क्षमता.

"मागता येईना भिक तर मास्तरकी शिक" या उक्तीनुसार उपजीविकेचे व पैसा कमी होण्याचा मार्ग म्हणून शिक्षकी व्यवसायाकडे बघितले जाते. वास्तविकता तशी नसून शिक्षक होण्यासाठी किंवा शिक्षक म्हणून त्याच्या अंगी शिक्षक व्यवसाय विषयक अभिवृत्ती असणे आवश्यक आहे. विषयाच्या सर्वांगीण सखोल ज्ञान आवश्यक आहे. त्याचे व्यक्तिमत्व हे सर्वांगीण असणे महत्त्वाचे आहे. त्याच्याकडे अध्यापन कौशल्य असणे महत्त्वाचे आहे आणि तो त्या कामासाठी सक्षम असणे महत्त्वाचे आहे. या गोष्टी त्याच्या अंगी असल्या तर तो भविष्यातील एक उच्चतम शिक्षक होऊ शकतो आणि भावी पिढीच्या सर्वांगीण विकासासाठी कारक ठरू शकतो. परंतु आज अनेक लोक, अनेक विद्यार्थी, अनेक इच्छुक या क्षेत्रात येत आहेत त्या परीक्षेत बसत आहेत परंतु त्यांच्या गुणांकडे पाहता असे लक्षात येते की, पाहिजे त्यामानाने हे गुण कमी आहे म्हणूनच जे विद्यार्थी या व्यवसायाकडे आलेले आहे किंवा हा व्यवसाय स्वीकारू इच्छिता त्यांची शिक्षक व्यवसायाची अभिवृत्ती आणि त्यांना सामायिक प्रवेश परीक्षेत मिळालेले गुण यांचा काही सहसंबंध आहे का? याचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**समस्या विधान**

शिरपूर तालुक्यातील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकांचे सामाईक प्रवेश परीक्षेतील गुण व त्यांची अध्यापन व्यवसाय अभिवृत्ती यांचा सहसंबंधाचा अभ्यास करणे.

**उद्दिष्टे**

1. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्या सामाईक प्रवेश परीक्षेतील गुणांचा तुलनात्मक अभ्यास करणे.
2. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्या अध्यापन व्यवसाय अभिवृत्तीचा तुलनात्मक अभ्यास करणे करणे.
3. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे सामाईक प्रवेश परीक्षेतील गुण व अध्यापन व्यवसाय अभिवृत्ती यांच्यातील सहसंबंधाचा अभ्यास करणे.
4. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थिनींचे सामाईक प्रवेश परीक्षेतील गुण व अध्यापन व्यवसाय अभिवृत्ती यांच्यातील सहसंबंधाचा अभ्यास करणे.

**परिकल्पना**

1. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्या सामाईक प्रवेश परीक्षेतील गुणांच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.
2. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्या अध्यापन व्यवसाय अभिवृत्तीच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.
3. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सामाईक प्रवेश परीक्षेतील गुण व अध्यापन व्यवसाय अभिवृत्ती यात सार्थक सहसंबंध आढळून येत नाही.
4. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या सामाईक प्रवेश परीक्षेतील गुण व अध्यापन व्यवसाय अभिवृत्ती यात सार्थक सहसंबंध आढळून येत नाही.

**संशोधन पद्धती** -

शिक्षणशास्त्र महाविद्यालय विद्यार्थ्यांचा सामाईक प्रवेश परीक्षेतील गुण व अध्यापन व्यवसाय अभिवृत्ती यातील सहसंबंधाचा सद्यस्थितीतील अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात आला होता. **जनसंख्या-** प्रस्तुत संशोधनात आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रथम वर्षाला प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांचे जनसंख्या म्हणून निश्चिती करण्यात आली होती.

**न्यादर्श-** प्रस्तुत संशोधनासाठी शिरपूर शहरातील आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांचे सहेतूक नमुना निवड पद्धतीने निवड करण्यात आली होती.

**संशोधनाची साधने-** प्रस्तुत संशोधनात माहिती संकलन करण्यासाठी खालील साधनांची निवड करण्यात आली होती.

1. **सामायिक प्रवेश परीक्षेतील गुण-** शैक्षणिक वर्ष 2020-21 मध्ये झालेल्या बी.एड. सामाईक प्रवेश परीक्षेत विद्यार्थ्यांना जे गुण मिळाले होते ते गुण ग्राह्य धरण्यात आले होते.
2. **अध्यापन व्यवसाय अभिवृत्ती-** प्रस्तुत संशोधनात विद्यार्थ्यांचे अध्यापन व्यवसाय विषयक अभिवृत्तीचे मापन करण्यासाठी डॉ उम्मी कुलसूम यांची अध्यापन व्यवसाय विषयक अभिवृत्ती कसोटीचा अवलंब

करण्यात आला होता या कसोटीत एकूण 55 विधान होती त्यात 30 विधाने होकारार्थी व 25 विधाने नकारार्थी होती विद्यार्थ्यांना प्रतिसाद बनवण्यासाठी पूर्ण सहमत सहमत असहमत पूर्ण असहमत अशी पर्याय देण्यात आले होते प्रस्तुत कसोटीची विश्वसनीयता ही 0.81 इतकी होती.

**संख्याशास्त्रीय परिमाणे-** प्रस्तुत संशोधनासाठी संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी मध्यमान, प्रमाण विचलन 't' मूल्य व 'r' मूल्य या संख्याशास्त्रीय परिमाणांचा अवलंब करण्यात आला होता.


**संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन-** प्रस्तुत संशोधनात शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे सामाईक परीक्षेतील गुण व त्यांनी दिलेल्या अध्यापन व्यवसाय विषयक अभिवृत्ती चाचणीला प्रतिसाद याचे विश्लेषण करून पुढील प्रमाणे परिकल्पना परीक्षण करण्यात आले आहे.

1. **शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्या सामाईक प्रवेश परीक्षेतील गुणांच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.**

**तक्ता क्रमांक** 01

शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनींचे सामाईक प्रवेश परीक्षेतील गुणांचे मध्यमान प्रमाणे चलन व 't' मूल्य दर्शविणारा तक्ता

| शिक्षणशास्त्र महाविद्यालय | नमुना | मध्यमान | प्रमाण विचलन | टेबल 't' मूल्य | प्राप्त 't' मूल्य | निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| विद्यार्थी | 40 | 70.33 | 3.45 | 2.00 | 1.19 | स्वीकार |
| विद्यार्थिनी | 40 | 71.26 | 3.49 | | | |



**निरीक्षण व अर्थनिर्वचन -**


स्वाधीनता मात्रा (78) साठी 0.05 सार्थकता स्तरावर टेबल 't' मूल्य 2.00 आहे. प्राप्त 't' मूल्य 1.19 असून ते टेबल 't' मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्या सामाईक प्रवेश परीक्षेतील गुणांच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही. दोन्ही गटातील मध्यमनातील फरक हा वास्तविक नसून तो योगायोगाने आला आहे. यावरून असे म्हणता येईल की, शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्या सामाईक प्रवेश परीक्षेत मिळालेले गुण सारखेच दिसून येतात.

2. **शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्या अध्यापन व्यवसाय अभिवृत्तीच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.**

**तक्ता क्रमांक** 02

शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्या अध्यापन व्यवसाय अभिवृत्तीचे मध्यमान प्रमाणे चलन व t मूल्य दर्शविणारा तक्ता

| शिक्षणशास्त्र महाविद्यालय | नमुना | मध्यमान | प्रमाण विचलन | टेबल 't' मूल्य | प्राप्त 't' मूल्य | निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| विद्यार्थी | 40 | 162.58 | 9.36 | 2.00 | 2.33 | त्याग |
| विद्यार्थिनी | 40 | 167.36 | 8.96 | | | |



**निरीक्षण व अर्थनिर्वचन-**

स्वाधीनता मात्रा (78) साठी 0.05 सार्थकता स्तरावर टेबल 't' मूल्य 2.00 आहे. प्राप्त 't' मूल्य 2.33 असून ते टेबल 't' मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्या अध्यापन व्यवसाय अभिवृत्तीच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येतो. दोन्ही गटातील मध्यमनातील फरक हा वास्तविक आहे. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांपेक्षा विद्यार्थिनीचे अध्यापन व्यवसाय अभिवृत्तीचे मध्यमान अधिक दिसून येते. यावरून असे म्हणता येईल की, शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थिनीची अध्यापन व्यवसाय अभिवृत्ती विद्यार्थ्यांपेक्षा अधिक दिसून येते.

3. **शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सामाईक प्रवेश परीक्षेतील गुण व अध्यापन व्यवसाय अभिवृत्ती यात सार्थक सहसंबंध आढळून येत नाही.**

**तक्ता क्रमांक** 03:

शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सामाईक प्रवेश परीक्षेतील गुण व अध्यापन व्यवसाय अभिवृत्तीचे 'r' मूल्य

| विद्यार्थी | नमुना | नमुना 'r' मूल्य | प्राप्त 'r' मूल्य | निर्णय |
|---|---|---|---|---|
| सामाईक प्रवेश परीक्षेतील गुण | 40 | 0.56 | 0.76 | त्याग |
| अध्यापन व्यवसाय अभिवृत्ती | | | | |

**निरीक्षण व अर्थनिर्वचन-** स्वाधीनता मात्रा (38) साठी 0.05 सार्थकता स्तरावर टेबल 'r' मूल्य 0.56 आहे. प्राप्त **'r'** मूल्य 0.76 असून ते टेबल **'r'** मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सामाईक प्रवेश परीक्षेतील गुण व अध्यापन व्यवसाय अभिवृत्ती यात सार्थक सहसंबंध आढळून येतो. प्राप्त **'r'** मूल्य 0.76 असून हा धनात्मक सहसंबंध असून तो उच्च प्रतीचा सहसंबंध आहे. यावरून असे म्हणता येईल की, शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या गुणांवरुन लक्षात येते की, त्यांची अध्यापन व्यवसाय अभिवृत्ती उत्तम आहे.

4. **शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या सामाईक प्रवेश परीक्षेतील गुण व अध्यापन व्यवसाय अभिवृत्ती यात सार्थक सहसंबंध आढळून येत नाही.**

**तक्ता क्रमांक 04:**

शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या सामाईक प्रवेश परीक्षेतील गुण व अध्यापन व्यवसाय अभिवृत्तीचे 'r' मूल्य

| विद्यार्थीनी | नमुना | नमुना 'r' मूल्य | प्राप्त 'r' मूल्य | निर्णय |
|---|---|---|---|---|
| **सामाईक प्रवेश परीक्षेतील गुण** | 40 | 0.56 | 0.78 | त्याग |
| **अध्यापन व्यवसाय अभिवृत्ती** | | | | |

5.

**निरीक्षण व अर्थनिर्वचन-** स्वाधीनता मात्रा (38) साठी 0.05 सार्थकता स्तरावर टेबल 'r' मूल्य 0.56 आहे. प्राप्त 'r' मूल्य 0.78 असून ते टेबल 'r' मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या सामाईक प्रवेश परीक्षेतील गुण व अध्यापन व्यवसाय अभिवृत्ती यात सार्थक सहसंबंध आढळून येतो. प्राप्त 'r' मूल्य 0.78 असून हा धनात्मक सहसंबंध असून तो उच्च प्रतीचा सहसंबंध आहे. यावरून असे म्हणता येईल की, शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या गुणांवरुन लक्षात येते की, त्यांची अध्यापन व्यवसाय अभिवृत्ती उत्तम आहे.

**निष्कर्ष**

1. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्या सामाईक प्रवेश परीक्षेतील गुणांच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.
2. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्या अध्यापन व्यवसाय अभिवृत्तीच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येतो.
3. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सामाईक प्रवेश परीक्षेतील गुण व अध्यापन व्यवसाय अभिवृत्ती यात धनात्मक सहसंबंध असून तो उच्च प्रतीचा सहसंबंध आहे.
4. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या सामाईक प्रवेश परीक्षेतील गुण व अध्यापन व्यवसाय अभिवृत्ती यात धनात्मक सहसंबंध असून तो उच्च प्रतीचा सहसंबंध आहे.

## निष्कर्ष व चर्चा

प्रस्तुत संशोधनात शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सामाईक प्रवेश परीक्षेतील गुण आणि अध्यापन व्यवसाय अभिवृत्ती त्यातील सहसंबंधाचा अभ्यास करण्यात आला होता त्यात असे दिसून आले की सामायिक प्रवेश परीक्षा विद्यार्थ्यांमध्ये सारखेच गुण आहेत तर अध्यापन व्यवसाय अभिवृत्ती यासंदर्भात विद्यार्थ्यांपेक्षा विद्यार्थिनींमध्ये अध्यापन व्यवसाय विषयक अभिवृत्ती अधिक आहे.

विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांच्या सामाईक प्रवेश परीक्षा व अध्यापन व्यवसाय अभिवृत्ती यात धनात्मक सहसंबंध दिसून येतो ज्यामुळे जे विद्यार्थी शिक्षणशास्त्र महाविद्यालयात प्रवेश घेतात त्यांच्या अध्यापन व्यवसाय विषयक अभिवृत्ती चांगली आहे असे म्हणावे लागेल. तसेच शैक्षणिक स्तरावर या विद्यार्थ्यांना त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी तसेच यांच्या अभिवृत्ती विकासासाठी अभ्यासक्रमात मूल्यांचा समावेश करणे गरजेचे आहे तो शालेय स्तरावर असून पुढे व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू होता त्यामुळे असो थोड्याफार प्रमाणात अभ्यासक्रमाच्या भाग म्हणून चारित्र्यवान नागरिक कसे तयार होतील याचा वापर केला पाहिजे त्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षक व्हायचं असेल त्यांनी स्वतःहून शिक्षक व्यवसाय संदर्भात माहिती गोळा करावी आपण आपला अध्यापनाचा आत्मविश्वास कसा वाढवू शकतो या संदर्भात चर्चा करावी त्या संदर्भात असलेले कार्यशाळा, सेमिनार, चर्चासत्रे यात सहभाग नोंदवावा ज्यामुळे या व्यवसायाप्रती अभिरुची आणि अभिवृत्ती  तयार होईल ज्यामुळे भविष्यात चांगले शिक्षक तयार होतील आणि त्यानुसार चांगले नागरिक घडवता येते जे आज समाजाची व राष्ट्राची एक नितांत गरज आहे बदलत्या काळानुसार बदलते शिक्षक असणे गरजेचे आहे आणि ते शिक्षणशास्त्र महाविद्यालय पूर्ण करते अशी आशा आहे.

## संदर्भग्रंथ सूची

भितांडे, वि. रा. (२००७). शैक्षणिक संशोधन पद्धती (प्रथम अभिवृत्ती). पुणे: नित्यनूतन प्रकाशन.

पंडित, बी. बी. (२००७). शिक्षणातील संशोधन. (प्रथम अभिवृत्ती). पुणे: नित्यनूतन प्रकाशन.

मुळे व उमाठे. (१९९८). शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे. (तिसरी  अभिवृत्ती). नागपूर: विद्या बुक्स प्रकाशन